# राष्ट्रीय आरोग्य अभियान
# १५ वा वित्त आयोग
## (जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी भंडारा)
## कंत्राटी Walk In Intervew पदभरती जाहिरात

राष्ट्रीय आरोग्य अभियान जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी भंडारा अंतर्गत १५ वा वित्त आयोगातंर्गत मंजुर पॉलिक्लिनीक (Polyclinic) करीता कंत्राटी पध्द्तीने वैद्यकिय विशेषज्ञ (Specialist) या पदांकरीता प्रस्तुत जाहीरातीत नमुद केल्याप्रमाणे पदांची शैक्षणिक अर्हता व इतर बार्बीची पूर्तता करणाऱ्या पात्र उमेदवारांकडुन अर्ज मागविण्यात येत आहे.

| Sr. No. | Specialist Post | Educational Qualification | Total Post Require | Remuneration Per Visit | Total Visit in One Year | OPD Time | Remarks |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Physician | MD Medicine / DNB | 1 | 5000 | 50 | OPD timing will be for 4 hours on the fixed date. ( Evening 5.00 PM to 9.00 PM.) | To Visit Once in every week Rs. 2000/- to be paid as fixed amount per visit + Rs.100/- per patient checked of his/her speciality to maximum Rs.5000/- visit |
| 2 | Obstetrics & Gynecologist | MD / MS Gyn / DGO / DNB | 1 | 5000 | 50 | | |
| 3 | Paediatrician | MD Paed / DCH / DNB | 1 | 5000 | 50 | | |
| 4 | Ophthalmologist | MS Ophthalmologist / DOMS | 1 | 5000 | 26 | | To Visit Once in every fortnight Rs. 2000/- to be paid as fixed amount per visit + Rs.100/- per patient checked of his/her speciality to maximum Rs.5000/- visit |
| 5 | Dermatologist | MD (Skin / VD), DVD / DNB | 1 | 5000 | 26 | | |
| 6 | Psychiatrist | MD Psychiatry / DPM / DNB | 1 | 5000 | 26 | | |
| 7 | ENT Specialist | MS ENT / DORL / DNB | 1 | 5000 | 25 | | |

### अर्जदारांकरीता अटि व शर्ती:-

१) १५ वा वित्त आयोगांतर्गत मंजुर पॉलिक्लिनीक (Polyclinic) करीता कंत्राटी पध्द्तीने वैद्यकिय विशेषज्ञ (Specialist) या पदांसाठी भरण्यात येणाऱ्या कंत्राटी उमेदवारांची निवड थेट मुलाखत पध्द्तीने करण्यात येईल.

२) सदरील पदे निव्वळ कंत्राटी पध्द्तीने केवळ प्रकल्प कालावधीपुरती भरावयाची असून प्रकल्प बंद होताच सदरील पदे आपोआप संपुष्ठात येतील.

३) सदरील पदे ठराविक मासिक मानधनावर असून शासनाच्या धोरणानुसार मानधनात बदल होऊ शकतो.

४) उपरोक्त कंत्राटी पदाची नेमणुक ही ११ महिन्यांच्या कालावधी पर्यंत अस्तित्वात राहील. काम समाधानकारक राहील्यास, पुढील कालावधी वाढविण्यासाठी विचार करण्यात येईल.

५) उमेदवाराने कामावर रुजु होण्यापुर्वी रुपये १००/- च्या स्टॅम्प पेपरवर विहीत नमून्यात करारनामा (बंधपत्र) करुन द्यावा लागेल.

६) वरील पदांकरीता सर्व शैक्षणिक तसेच इतर प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती अर्जासोबत सादर कराव्यात. तसेच स्वतः स्वाक्षरी केलेला फोटो अर्जावर चिकटवावा.

७) वरील तक्त्यातील नमुद अ.क्र. ०१ ते ०७ पदांकरिता **Walk in Interview** हे दिनांक 28/08/ २०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापन कक्ष, राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यालय, जिल्हा परिषद परिसर, भंडारा येथे आयोजित करण्यात आलेली आहे. त्याकरिता खालीलप्रमाणे कालमर्यादा ठेवण्यात आलेली आहे.

NHM Bhandara

| अ.क्र. | विवरण | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| १. | उमेदवारांची नोंदणी करणे | 28/08/2023 | सकाळी ११.०० ते सकाळी १२.०० |
| २. | उमेदवारांच्या अर्जाची डाटा ऐन्ट्री करणे | | सकाळी १२.०० ते दुपारी ०१.०० |
| ३. | उमेदवारांचे मुळ दस्ताऐवज तपासणे | | दुपारी ०१.०० ते दुपारी ०२.०० |
| ४. | मुळ दस्ताऐवज तपासणी नंतर गुणवत्ता यादी प्रसिध्द करणे | | दुपारी ३.०० ते दुपारी ०५.०० |

८) उमेदवार भंडारा जिल्हयातील रहिवासी असल्यास प्राधान्य देण्यात येईल.

९) उमेदवारांना शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे महाराष्ट्र नागरी सेवेचे नियम लागू राहणार नाहीत. तसेच त्यांना भविष्यात कायम नोकरीचा दावा करता येणार नाही.

१०) निवड झालेल्या उमेदवारांना पुनर्नियुक्ती अंतर्गत पुढील ११ महिने किंवा मा. अध्यक्ष जिल्हा निवड समिती तथा मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, भंडारा ठरवतील तोपर्यंत नियुक्ती आदेश देय राहील.

११) जास्त उमेदवारांचे अर्ज प्राप्त झाल्यास छाननीअंती एका पदास तिन अथवा पाच उमेदवार (१:३) अथवा (१:५) याप्रमाणे पदानुसार पदवी/पदविका इत्यादी शैक्षणिक पात्रतेच्या अंतिम वर्षाच्या परीक्षेतील गुणवत्तेनुसार मुलाखतीसाठी गुणांचा कट-ऑफ लावण्यात येईल.

१२) प्राप्त अर्जाच्या छाननीअंती पात्र ठरणाऱ्या उमेदवारांना मुलाखतीसाठी प्रवेश देण्यात येईल.

१३) निवड प्रक्रियेची पध्द्त पुढीलप्रमाणे राहील.

| | | |
|---|---|---|
| अ) | थेट मुलाखती :<br>Physician,<br>Obstetrics & Gynecologist,<br>Pediatrician,<br>Ophthalmologist,<br>Dermatologist,<br>Psychiatrist,<br>ENT Specialist | 1) Subject Knowledge (10)<br>2) Research and Academic Knowledge (10)<br>3) Leadership Quality (10)<br>4) Administrative Abilities (10)<br>5) Experience (10)<br>a) For Govt. Experience – 2 marks for 1 year<br>b) For Privae Experience – 1 mark for 1 year<br>TOTAL MARKS - 50 |

१४) पुनर्नियुतीबाबत शासकिय नियमित सेवेत सामावून घेणेबाबत किंवा शासनामार्फत सेवा संरक्षणाबाबत उमेदवारांना कुठलाही दावा करता येणार नाही.

१५) अर्जदाराला कंत्राटी कालावधीत त्यांचे सोईनुसार ठिकाण बदलून मिळण्याची मागणी करता येणार नाही. नियुक्ती दिलेल्या उमेदवारांना त्यांना दिलेल्या कार्यक्षेत्रात मुख्यालयी राहून सेवा देणे बंधनकारक राहील.

१६) अर्जदारांनी आपल्या अर्जावर त्यांचे सध्या सुरु असलेला मोबाईल नंबर व ई-मेल आयडी अचूक नोंदवावा. तसेच ते भरतीप्रक्रिया पुर्ण होईपर्यंत सुस्थितीत राहील याची दक्षता घ्यावी.

१७) राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचे दिनांक २७ मे, २०१९ चे पत्राला अनुसरुन अर्ज करण्याच्या शेवटच्या दिनांकास उमेदवाराचे कमाल वय ७० वर्षे पर्यंत राहील. तसेच सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांची सेवाप्रवेश व सेवासमाप्तीची वयोमर्यादा ६५ वर्ष इतकी असून वय ६० किंवा त्यापेक्षा अधिक वयाच्या उमेदवारांनी जिल्हा शल्य चिकित्सक यांचेकडून प्राप्त केलेले शारिरीकदृष्ट्या सक्षम असल्याचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे बंधनकारक राहील.

NHM Bhandara

१८) भरती प्रक्रिये दरम्यान ज्या-ज्या उमेदवारांना बोलाविण्यात येईल, त्या-त्या वेळी त्यांना स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल. तसेच सदर उपस्थितीकरीता कोणतेही मानधन अथवा प्रवास खर्च देय राहणार नाही.

१९) अर्जदार हा संबंधित पदासाठी शारिरीक व मानसिकदृष्टया सक्षम असावा तसेच अर्जदराविरुध्द कोणताही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.

२०) भरती प्रक्रिये दरम्यान उमेदवाराने चुकीची माहिती सादर केल्याचे, कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे, दबाव तंत्राचा वापर किंवा अनुचित मार्गाचा अवलंब केल्याचे आढळून आल्यास कोणत्याही टप्प्यावर त्याची उमेदवारी/नियुक्ती कोणतीही पुर्वसुचना न देता रद्द करण्यात येईल.

२१) लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र नमुना-अ या प्रपत्रात अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील.

२२) भरती प्रक्रियेचे संपुर्ण अधिकार, पदे कमी-जास्त करणे, भरती प्रक्रिया रद्द करणे, अटी व शर्तीमध्ये बदल करणे व आवश्यकतेनुसार पदे घेण्याचे इत्यादी सर्व अधिकार मा. अध्यक्ष जिल्हा निवड समिती तथा मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, भंडारा यांचेकडे राखुन ठेवले आहे.

२३) जाहिरातीमध्ये नमुद केल्याप्रमाणे अ.क्र. ०१ ते ०३ च्या पदाकरिता उमेदवार उपलब्ध न झाल्यास दर आठवडयाचा प्रत्येक सोमवारी Walk in Interview द्वारे राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यालय, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद परिसर, भंडारा येथे पदभरती घेण्यात येईल.

महत्वाची सुचना :- पात्र, अपात्र उमेदवारांची यादी व मुलाखतीचा दिनांक मा. जिल्हाधिकारी भंडारा व मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद भंडारा येथील कार्यालयीन संकेतस्थळावर उपलब्ध होईल. (मुलाखती करीता/निवड झालेल्या उमेदवारांना या कार्यालयामार्फत कुठल्याही प्रकारचे भ्रमणध्वनीद्वारे संपर्क करण्यात येणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.)

09/8/2023

सदस्य
जिल्हा निवड समिती तथा
जिल्हा शल्य चिकित्सक
तथा सदस्य
जि.ए.आ.व कु.क.सोसायटी
जिल्हा रुग्णालय, भंडारा

सदस्य सचिव
जिल्हा निवड समिती तथा
जिल्हा आरोग्य अधिकारी
तथा सदस्य सचिव
जि.ए.आ.व कु.क.सोसायटी
जिल्हा परिषद, भंडारा

9.8.23

अध्यक्ष
जिल्हा निवड समिती तथा
मा. मुख्य कार्यकारी अधिकारी
तथा अध्यक्ष
जि.ए.आ.व कु.क.सोसायटी
जिल्हा परिषद, भंडारा

NHM Bhandara

# राष्ट्रीय आरोग्य अभियान

## अर्जाचा नमुना

## जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी

## आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, भंडारा

## पदासाठी अर्ज

| पासपोर्ट आकाराचा फोटो चिकटवून स्वतः साक्षांकित करणे. |
|---|

**अर्जाचा कार्यालयीन नोंदणी क्र. :-**

प्रति,

मा. मुख्य कार्यकारी अधिकारी,

जिल्हा परिषद, भंडारा

संदर्भ :- दैनिक वृत्तपत्र.......................................दिनांक...................मधील जाहिरात.

महोदय,

जाहिरातीनुसार, मी..........................................पदाकरिता अर्ज करीत असून माझा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

१. उमेदवाराचे संपुर्ण नाव :- ............................................

२. पत्रव्यवहाराचा संपूर्ण पत्ता (पिनकोडसह) :- ............................................

............................................

............................................

३. दुरध्वनी/भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल :- ............................................

............................................

४. जन्मतारिख :- अंकात............................................

अक्षरात....................................दिनांक.................रोजीचे वय............वर्ष

५. महाराष्ट्राचा मूळ रहिवाशी आहे काय :- होय/नाही

६. विवाहीत/अविवाहीत :- ............................................

७. विवाहीत असल्यास लहान कुटूंबाचे प्रमाणपत्र सोबत जोडले आहे काय :- होय/नाही

८. अर्जदाराची शैक्षणिक अर्हता :-

| अ.क्र. | शैक्षणिक अर्हता | उत्तीर्ण होण्याचे वर्ष | परिक्षा मंडळाचे/विद्यापिठाचे नांव | एकुण गुण | प्राप्त गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

९. इतर शैक्षणिक अर्हता :............................................

............................................

१०. अर्जासोवत जोडलेल्या प्रमाणपत्राची यादी (सांक्षाकिंत प्रती जोडाव्यात)

१)............................................., ५)...............................................

२)............................................., ६)...............................................

३)............................................., ७)...............................................

४)............................................., ८)...............................................

मी, असे प्रमाणित करतो/करते की, आपले कार्यालयातील......................................
या कंत्राटी पदाची जाहिरात मी काळजीपूर्वक वाचली असून सदर जाहिरातीतील अटी व शर्ती मला मान्य आहेत. वरील अर्जात दिलेली माहिती खरी असून चुकीची व खोटी आढळून आल्यास मी कायदेशीर कारवाईस पात्र राहील.

ठिकाण :- .....................

दिनांक :- .....................

उमेदवाराची स्वाक्षरी :-.............................

उमेदवाराचे पुर्ण नाव :-.............................

NHM Bhandara

## महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ मधील प्रतिज्ञापत्राचा नमुना-अ

### प्रतिज्ञापत्र

### (नियम-४ पाहा)

श्री/श्रीमती/कुमारी............................................श्री................................
यांचा/यांची मुलगा/मुलगी/पत्नी, वय...............वर्ष, राहणार.....................................
.......याद्वारे पुढीलप्रमाणे असे जाहीर करतो/करते की,

१) मी..........................................या पदासाठी माझा अर्ज़ दाखल केलेला आहे.

२) आज रोजी मला................(संख्या) इतकी हयात मुले आहेत त्यापैकी दिनांक २८ मार्च २००५ यानंतर जन्माला आलेल्या मुलांची सख्या............आहे. (असल्यास जन्म दिनांक नमुद करावा)............................

३) हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च २००६ नंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल याची मला जाणीव आहे.

दिनांक :-

ठिकाण :- अर्जदाराची स्वाक्षरी

### प्रतिज्ञापत्र

मी याद्वारे शपथपूर्वक कथक करतो/करते की, अर्जात नमुद केलेली माहिती माझ्या माहितीनुसार सत्य आणि बरोबर आहे. त्यातील कोणतीही गोष्ट चुकीची आढळल्यास मला निवड प्रक्रियेतून अपात्र घोषित केले जाईल आणि जर निवड/नेमणुक झाल्यास माझी सेवा कोणतीही पुर्वसूचना दिल्याविना समाप्त केल्या जाईल याची मला जाणीव आहे.

मी याद्वारे कथन करतो/करते की, मला शासकीय सेवेकरिता अपात्र घोषित केलेले नाही, मला फौजदारी गुन्हयात अटक वा शिक्षा झालेली नाही व माझ्याविरुध्द कोणत्याही फौजदारी न्यायालयात खटला प्रलंबित नाही.

दिनांक :-

ठिकाण :- अर्जदाराची स्वाक्षरी

(नाव व पत्ता)

NHM Bhandara